*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# कोरोना विषाणू आणि आंतरराष्ट्रीय राजकारण

प्रा.बाळासाहेब बजरंग सरगर
डॉ.पंतगराव कदम आर्टस् आणि कॉमर्स कॉलेज , पेण

**प्रस्तावना :** कोरोना व्हायरस सध्या जगात महामारीच्या स्वरूपात व्यापलेले आहे. या व्हायरस ने जगातील व्यवस्था व आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभाव पडला आहे. कोरोना व्हायरस प्रथम १९६० च्या दशकात सापडले .'कोरोना' म्हणजेच 'कोविड १९' विषाणूंचा संसर्ग वणव्यासारखा पसरत चालला आहेलाख १तील देशां १०३जगातील .,१४ हजार, ५०० लोकांना त्याची लागण झाली असून आजवर ४,०२४ हून अधिक लोकांचा बळी घेतला आहे. चीन, कोरिया जपान, इटली, इराण आणि अमेरिकेतही या विषाणूचा संसर्ग झालेल्यांची संख्या वाढू लागली आहे .पण या वायरस ची सध्या सुरुवात चीन मधील वूहान प्रांतातून झाली. व यावेळी चीनची या वायरस बाबतची भूमिका संशयास्पद असल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात पडसाद उमटले. तसेच यावेळी आंतरराष्ट्रीय राजकारणात या वायरसच्या जगात पसरण्या अगोदर अमेरिकन – चीन यांच्यातील संघर्षाची पार्श्वभूमी असल्याने या कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर या संघर्षाची तीव्रता वाढवली. तसेच चीनची या परिस्थिती भूमिका याबाबत आंतरराष्ट्रीय राजकारण घडू लागलेले दिसते. त्याचा आढाव प्रस्तुत लेखात स्पष्ट केले आहे.

**कोरोना विषाणूचा प्रसार :** कोरोना व्हायरस हा विषाणूंचा एक गट असून हा विषाणू समुळे सस्तन प्राण्यांना आणि पक्ष्यांना विविध रोगप्रसार मधून निर्माण होतो .कोरोनाव्हायरस प्रथम १९६० च्या दशकात सापडले. २०१९मध्ये कोरोना व्हायरसचा एक उपप्रकार चीनमधील वूहान शहरात आढळून आला. याला कोव्हिड-१९ असे नाव देण्यात आले. सुरुवातीस वुहान व आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू त्याच्या इतर उपप्रकारांपेक्षा अधिक तीव्रतेचा असून याने रोग्यांच्या मरण्याचे प्रमाण मोठे आहे. १३ मार्च २०२० अखेर जगात १,३२,७५८ जणांना या आजाराची लागण झाली असून एकूण ४९५५ जणांचा मृत्यू झाला आहे. एकूण १२२ देशांमध्ये हा आजार पसरला आहे. चीनमधील हूबै प्रांतात या आजारामुळे सर्वाधिक बळी गेले आहेत. हूबै प्रांतातील वूहान शहरातून या विषाणूची लागण सुरू झाली. या आजारामुळे चीन देशात १३ मार्च २०२० अखेर ३१८० जणांचा बळी गेला असून ८० हजार ९९१ जणांना लागण झाली असल्याचे समोर आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत माहिती जारी केली आहे. ६ एप्रिल २०२० अखेर जगात एकूण १२,१०,९५६ जणांना या आजाराची लागण झाली असून एकूण ६७,५९४ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी युरोपीय देशांत ४९,४७९ तर अमेरिकेत ९,६८० मृत्यू झाले आहेत.

**कोरोना विषाणू व आंतरराष्ट्रीय राजकारण :** जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना व्हायरसला आंतरराष्ट्रीय आणीबाणी म्हणून घोषित केले आहे. एखादा आजार किंवा साथीचा रोग पसरल्यास पब्लिक हेल्थ इमर्जन्सी घोषित करण्याचा कायदा २००७ मध्ये आला होता. या व्हायरसचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्वतरावर समन्वय साधता येईल यासाठी ही घोषणा करण्यात आली आहेज्या देशांमध्ये आरोग्य व्यवस्था कमकुवत आहेत ., अशा देशांमध्ये व्हायरसचा प्रसार रोखणे हा मोठा चिंतेचा विषय असल्याचे डब्ल्यूएचओचे प्रमुख ट्रेड्रोस अ[illegible]म स्पष्ट केलेले दिसते .

**१. चीन व जागतिक आरोग्य संघटना व अमेरिका यांच्यात तणाव :**

जगात कोरोना व्हायरस ने हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे. या व्हायरसची निर्मिती ज्या चीनमध्ये झाली आहे. त्या चीन ने जर या व्हायरस ला तिथेच रोखलं असतं तर जगावर ही वेळ आली नसती. मात्र, चीनने केलेल्या चुकीचा सर्व जगाला त्रास होत आहे. मात्र, जेव्हा चीनमध्ये कोरोना व्हायरस पसरत होता. तेव्हा WHO (World Health Organization) जागतिक आरोग्य संघटनां ची भूमिका काय होती. चीन ची आंतरराष्ट्रीय विमानं का थांबवली नाही? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नाबाबत अमेरिका व युरोपीय देशांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिक आरोग्य संघटनेने चीन वर बंधन का आणली नाही यावर प्रश्न उपस्थित केली. यावेळी असा आरोप लावला जातो की, चीन सरकारने जागतिक आरोग्य संघटनेला ३१ डिसेंबर रोजी कोरोनाच्या प्रादुर्भावाची अधिकृत माहिती दिली. मात्र, त्याच्या कितीतरी आधी, म्हणजे ऑक्टोबरमध्ये हा विषाणू मानवी शरीरात संक्रमित व्हायला सुरुवात झाली होती, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ही माहिती मिळाल्यानंतर सुद्धा ‘डब्लूएचओ’ने तपास पथक पाठविण्याची कुठलीही तातडीची हालचाल केली नाही. चीन सरकार दुखावले जाऊ नये याची काळजी वाहण्यातच ‘डब्लूएचओ’ने धन्यता मानली. अखेर फेब्रुवारी महिना अर्धा उलटून

गेल्यानंतर जागतिक आरोग्य संघटना व चीन सरकारचे संयुक्त पथक वुहानमध्ये दाखल झाले आणि या पथकाने चीनला अनुकूल असा अहवाल दिला आहे. त्याचवेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना व्हायरसची स्थिती योग्यप्रकारे न हाताळल्याबद्दल आणि चीनची बाजू घेतल्याचा आरोप करत, अमेरिकेकडून WHO ला देण्यात येणाऱ्या निधीवर बंदी घातली.

**२. कोरोना काळात चीन व अमेरिका यांच्यातील राजकारण :**

जगभरात थैमान घातलेल्या कोरोना व्हायरसमुळे जीवित आणि आर्थिक हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. या व्हायरसमुळे अर्थव्यवस्थाही डबघाईला आली आहे. तशात आता जगाचं राजकारणही यामुळे अमुलाग्र बदलू शकते असे मानले जाऊ लागले आहे. कोरोना व्हायरसमुळे चीन आणि अमेरिकेतला तणाव वाढला आहे. जगभरामध्ये कोरोना व्हायरसनं कहर केलेला असताना चीन आणि अमेरिकेमध्ये भलतंच राजकारण रंगलंय. या व्हायरसचा उगम नेमका कसा झाला, यावरून या दोन देशांमध्ये ब्लेमगेम सुरू झालाय. चीनचे परराष्ट्रमंत्री झाओ लिजिआन यांनी अमेरिकन लष्करानं कोरोना व्हायरस वुहानमध्ये आणला असावा, अशी शंका ट्विटरवर व्यक्त केली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पत्रकार परिषदेत कोरोनाचा उल्लेख 'फॉरेन व्हायरस' असा करून अप्रत्यक्षपणे चीनकडे बोट दाखवलं. यावर कडी करत अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री माईक पॉम्पिओ यांनी या विषाणूचा उल्लेख 'वुहान व्हायरस' असा करून टाकला. ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वी युरोप-अमेरिकेतील प्रवास महिनाभरासाठी स्थगित केला. यामुळे युरोपियन युनियन संतप्त झाली आहे. युरोपातील देशांशी किंवा युनियनशी चर्चा न करता ट्रम्प यांनी परस्पर निर्णय घेतल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

अर्थात ट्रम्प यांनी याचा बचाव करताना घाईघाईत निर्णय घेणं आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला आहे. यामुळे युरोपची नाराजी दूर होणं अर्थातच शक्य नसताना चीननं आपत्तीचा फायदा उचलण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यामुळेच कोरोनाचा फटका बसलेल्या इटलीला चीननं औषधांसह इतर साहित्य धाडून दिलंय तसंच स्पेनला मदतीची तयारी दाखवली आहे. युरोपशी जवळीक साधण्याचा ड्रॅगनचा प्रयत्न स्पष्ट दिसतोय. या वायरसमुळे चीन व अमेरिका यांच्या मध्ये मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झालेला दिसतो.

**३. आंतरराष्ट्रीय राजकारणात भू-राजकीय संघर्षाच्या देशाने**

जागतिक आरोग्य संघटनेने नामकरण केलेल्या कोविड या विषाणूने १९-जगापुढे मोठे आव्हान उभे केले आहे. या विषाणूमुळे चीनने आपल्याधोरणात बदल केले व त्यांनी आक्रमकता धोरणाचा स्वीकार केला आहे.यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात भू-राजकीय संघर्षाच्या दिशेने जागतिक राजकारण सुरु झाले आहे. यातून प्रेत्यक राष्ट्र आपल्या क्षेत्राचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विविध कायदे करून बचाव करत आहे. यातच चीन अमेरिका व युरोपीयन देश यांच्यात व्यापार आणि इतर विषयाबाबत तणाव निर्माण होऊ लागला आहे.

**४. कोरोना विषाणू काळात आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थावर प्रभाव :**

कोरोना संकटकाळात जगातील विविध देशांच्या अर्थ व्यवस्था प्रभावित होऊ लागल्या आहेत. ज्यात महामंदी येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामूळे प्रत्यके देश आपली अर्थव्यवस्था सावरण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद करत आहेत. पण जगात आया विषाणूने एकल आर्थिक स्पर्धा निर्माण केली आहे. याचा फायदा चीन उचलत आहे. जगातील बहुतांश देशातील कारभार बंद आहेत. यामुळे उद्योग व्यवसाय बंद झाले आहेत. ज्याचा परिणाम आर्थिक व्यवस्था प्रभावित झाल्या आहेत.

**सारांश :**

अशा पद्धतीने कोरोना विषाणूचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात पडलेला दिसतो. याचे दूरगामी परिणामांची मीमांसा ला अजून वेळ आहे. पण तात्कालीन घडामोडी वरून याचा अंदाज येतोकी आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघटना, अर्थव्यवस्था, व्यापार, विदेशी धोरण या सर्वांची पुन्हा एकदा मांडणी करणे गरजेचे बनले आहे.

**संदर्भसूची :**

१.लोकसत्ता

२.बीबीसी न्यूज

३.सकाळ

५.बहुधविधा.कॉम